कायम विना अनुदान तत्वावर.

जा.क्र. माधि-३/२००२-२००३/

विभागीय शिक्षण उपसंचालकांचे कार्यालय
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
दिनांक :- 7 MAY 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,
औरंगाबाद.

विषय :- २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत..

संदर्भ :- शासन पत्र क्र. नमाशा/१००३/(१९५/२००३)/माशि-१, दिनांक १.४.२००३

वरील विषयी संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, नवीन माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खाली नमुद केलेल्या एका शैक्षणिक संस्थेस त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान तत्वावर** नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | मातोश्री तुलसी शिक्षण प्रसारक मंडळ, सिल्लोड जि. औरंगाबाद | ओहर ता.जि.औरंगाबाद | मराठी | ८ वी |
| २. | अलसबाह एज्युकेशन सोसायटी, बार्व जि.औरंगाबाद | गरमपाणी ता.जि.औरंगाबाद | उर्दू | ८वी |

सदर संस्थेला माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

अ) या नवीन माध्यमिक शाळेला कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची मदत देण्यात येणार नाही.

ब) सदर माध्यमिक शाळेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे कांटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क) शासनाच्या पुर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

कृ. मा. पा.

ड) संस्थेच्या अध्यक्षांकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन ते स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

इ) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ई) **``कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा``** असा फलक अशा शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

फ) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना **``कायम विना अनुदानित शाळा``** अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुर्तता केल्याची खात्री करुन, संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) ``कायम विना अनुदान`` तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तीची व अटींची पुर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळेला परवानगी दिली जाईल याची दक्षता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यांनी घेऊन अंतीम परवानगी देण्याबाबत सदर शाळेचा प्रस्ताव आठ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा.

शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
१) मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे-१.
३) अध्यक्ष/सचिव, संबधित संस्था.